## पुष्प – २४ : दया

**आणि जयाचिये अंगें । न शिणे लोकु ।...**

१. क्षमा आणि करूणा हे दोन्ही गुण जिथे नांदतात तिथे संतत्व वसते असा भागवतधर्माचा सांगावा.

२. माउली मुक्ताबाई ताटीच्या अभंगात तेच सांगतात.

३. स्वत: आघात सोसून जगाला योग्य मार्गावर सुरक्षित राखण्यासाठी जो जगात व्यवहार करतो त्याला भागवत धर्म 'संत' असे संबोधतो.

४. हेच ज्ञानोबाराय समुद्राचे उदाहरण देऊन सांगतात : जगाने कितीही उपसर्ग दिला तरी संत त्याचा खेद मानत नाहीत.

५. प्राणिमात्रांची दया हेच संतांचे भांडवल हेच तुकोबारायही सांगतात.

*************************************************

**संतबोल**

- संत तो चिं जाणा जगीं। दया क्षमा ज्याचें अंगीं।। (श्रीमुक्ताबाईमाउली)
- तुका म्हणे तोचि संत। सोसी जगाचे आघात।। (श्रीतुकोबाराय)
- तरी सिंधुचेनि माजें। जळचरां भय नुपजे। आणि जळचरीं नुबगिजे। समुद्रु जैसा।। (ज्ञा. १२.१६५)
- तेविं उन्मत्तें जगें। जयासि खंती न लगे। आणि जयाचेनि आंगें। न शिणे लोकु।। (ज्ञा. १२.१६६)
- जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टविती पर उपकारें।।
  भूतांची दया हे भांडवल संतां। आपुली ममता नाहीं देहीं।। (श्रीतुकोबाराय)

**मंजिरी – २४**

१. भागवत धर्म भक्तीचे जे तत्त्व आपल्याला शिकवतो ते आगळेवेगळे आहे.

२. जगरूपाने जनार्दनच नटलेला आहे, हा या भक्तीच्या शिकवणुकीचा गाभा. : ज्ञानोबारायांचा ‘वासुदेव’ तेच तर सांगत येतो आपल्याला भल्या पहाटे.

३. त्यांमुळे, जगाची सेवा हीच जगदीश्वराची सेवा हे भागवत धर्म आपल्याला शिकवतो.

४. समाज चुकीच्या मार्गाने वाटचाल करत असेल तर त्याला योग्य मार्ग दाखवणे, हे संत आपले कर्तव्य समजतात ते याच भूमिकेतून : जगाचे वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करायचा तर संतांनी जगाबरोबर राहून जगराहाटीप्रमाणेच व्यवहार केला पाहिजे.

************************************************

**संतबोल**

- आतां ऐसेंची अवघे जन। येतें जातें तयापासून। जगीं जग झालें जनार्दन। उदो प्रगटलें बिंबलें भान।। (श्रीज्ञानोबाराय)
- अर्भकाचे साटीं। पंतें हातीं धरिली पाटी।। तेसे संत जगीं। क्रिया करूनी दाविती अंगीं।। (श्रीतुकोबाराय)
- आपणचि विश्व आपणचि विश्वेश। जेथें द्वेषाद्वेश मावळले।। (श्रीनिवृत्तिनाथ)
- जग अवघें देव। मुख्य उपदेशाची ठेव।। (श्रीतुकोबाराय)